नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/०२/२०२६ (सोमवार )**

## नागपुर ग्रामीण जिल्हयात पोलीस भरती प्रक्रियेची मैदानी चाचणी पारदर्शक व नियमबद्ध पद्धतीने यशस्वीरित्या पार पडली

संपुर्ण राज्यभरात दिनांक ११/०२/२०२६ रोजी पासुन पोलीस भरती प्रक्रियेच्या मैदानी चाचणीला सुरूवात झाली. नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक ११/०२/२०२६ ते १९/०२/२०२६ रोजी पर्यंत पुरूष उमेदवार तसेच दिनांक २०/०२/२०२६ ते २३/०२/२०२६ रोजी पर्यंत महीला उमेदवारांची पोलीस भरती प्रक्रीया पार पडली. एकुण २७२ पदांसाठी राज्यभरातुन १६,१०७ इतक्या उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. सदर प्रक्रीयेमध्ये उमेदवारांची प्राथमिक कागदपत्र पडताळणी, बायोमेट्रिक नोंदणी प्रक्रिया आणि मैदानी चाचणी अत्यंत काटेकोरपणे पार पाडण्यात आली. संपूर्ण प्रक्रियेदरम्यान सीसीटीव्ही देखरेख, व्हिडिओ रेकॉर्डिंग, RFID (Radio Frequency Identification) म्हणजे रेडिओ फ्रिक्वेन्सी तंत्रज्ञान अशा तांत्रिक प्रणालींचा वापर करून पारदर्शकता राखुन संपुर्ण प्रक्रीया पार पाडण्यात आली.

मैदानी चाचणीदरम्यान पात्र उमेदवारांचे १६००/८०० मिटर धावणे, १०० मिटर, गोळाफेक असे टप्पे यशस्वीरित्या पूर्ण झाले. दोन वेळा बायोमेट्रिक पडताळणीमुळे उमेदवारांची ओळख निश्चित करून गैरप्रकारांना आळा घालण्यात

आला. RFID प्रणालींमुळे (१६०० मिटर पुरूष, ८०० मिटर महीला धावणे, १०० मिटर धावणे ही प्रक्रीया पारदर्शक पणे पार पडली.

भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवांराची गैरसोय होवु नये यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक त्या सर्व सुविधा उमेदवांराना उपलब्ध करून दिल्या होत्या. मैदानावर उमेदवारांसाठी नि:शुल्क बिस्कीट, ग्लुकोज उपलब्ध करून देण्यात आले होते. तसेच बाहेरगावहुन आलेल्या उमेदवारांसाठी निवास आणि मुलभुत सोयींची व्यवस्था करण्यात आली होती. सदर भरती प्रक्रीयेसाठी योग्य पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला होता.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि देखरेखीखाली नागपुर ग्रामीण जिल्यातील पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांनी संपुर्ण भरती प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली.




26


4481
2445
3557
1682











## पोलीस स्टेशन देवलापार हद्दीतील अवैध दारू व्यवासायात सक्रिय आरोपी कपुरचंद अमरलाल वरखडे याला एम.पी.डी.ए कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन देवलापार :— पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत **आरोपी नामे कपुरचंद अमरलाल वरखडे, वय ४० वर्ष, रा. नवेगाव चिचदा, ता. रामटेक, जि. नागपूर** याचेवर अवैध दारू बाबत अनेक गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. नमुद आरोपी हा हातभट्टी मोहाफुल गावठी दारू तयार करून विक्री करतो. त्याचे गुन्हेगारी नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी कारवाई करून त्याचेवर गुन्हे नोंद केले. तसेच पोलीसांनी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. तरीसुध्दा **कपुरचंद अमरलाल वरखडे** याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. त्याच्या गुन्हेगारी कृत्यामुळे अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. नमुद आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर

पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात देवलापार पोलीसांकडुन एम.पी.डी.ए कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी,नागपुर यांनी नमुद आरोपीला स्थानबध्द करण्याचा आदेश पारीत केले आहे.

**देवलापार पोलीसांनी नमुद आरोपी नामे कपुरचंद अमरलाल वरखडे, वय ४० वर्ष, रा. नवेगाव चिचदा, ता. रामटेक जि. नागपूर यास तात्काळ आज दिनांक २३/०२/२०२६ रोजी ताब्यात घेवुन त्याला मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल केले.**



**आरोपी कपुरचंद अमरलाल वरखडे**

# रेती तस्करी करणारा सराईत गुन्हेगार विनोद शेषराव भोयर याला मौदा पोलीसांनी एमपीडीए कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

**पोलीस स्टेशन मौदा:—** सराईत आरोपी नामे **विनोद शेषराव भोयर, वय ४५ वर्ष, रा. प्लॉट नं. ५२१, गोकुळ डेयरी जवळ, भारत नगर, कळमना मार्केट, पो.स्टे. कळमना, नागपुर** याचे वर नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथे अवैधरित्या विनापरवाना रेती चोरीचे अनेक गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपी अशा प्रकारचे गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. असे गुन्हे करून तो शासनाचा महसुल बुडवुन शासनाचे आर्थिक नुकसान करतो तसेच पर्यावरणाला नुकसान पोहचवतो. नागपुर ग्रामीण पोलीसांनी त्याचेविरूध्द वेळोवेळी कारवाई करून त्याचेवर गुन्हे नोंद करून त्याला अटक केले आहे. नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी **विनोद शेषराव भोयर** याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली.

**मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात मौदा पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दिनांक २३/०२/२०२६ रोजी मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी सराईत गुन्हेगार विनोद शेषराव भोयर याचे विरूध्द स्थानबध्दतेता आदेश काढला असता मौदा पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन त्याला ताब्यात घेतले असुन नमुद आरोपीला अटक करण्याची प्रक्रीया सुरू आहे.**



**आरोपी विनोद शेषराव भोयर**

## अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ९ गोवंश जनावरांची सुटका, १ आरोपी अटक
## देवलापार पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक २३/०२/२०२६ रोजी पहाटे देवलापार पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्तबातमीदाराने माहीती दिली की, जबलपुर कडुन नागपुर कडे गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक केली जात आहे .मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी जुने देवलापार पोलीस स्टेशन समोर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान एक संशयीत टाटा इंट्रा वाहन क्रमांक एम.पी २८ जी ५५४४ हे मिळुन आले. नमुद वाहन चालकाने आणि त्याच्या साथीदाराने पोलीसांची नाकाबंदी पाहुन काही अंतरावर वाहन थांबवुन वाहन सोडुन पळ काढला. पोलीसांनी शिताफिने त्यांचा पाठलाग करून वाहन चालकाच्या साथीदाराला पकडले. त्याला नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव **मोहम्मद माजीद मोहम्मद साबीर शेख, वय ३४ वर्ष रा. मौलाना चौक, छोटी मजीद के पास, लष्करी बाग, नया नकासा, नागपूर असे असल्याची माहीती दिली. त्याला चालकाचे नाव विचारले असता**

**टाटा इंट्रा वाहन क्रमांक एम.पी २८ जी ५५४४ चा चालक/मालक आरोपी उजेब रा. नागपुर हा असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ९ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद गोवंश जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन, चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयीतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून टाटा इंट्रा वाहन क्रमांक एम पी २८ जी ५५४४ किंमती ५,००,००० /—रूपये आणि ९ गोवंश जनावरे किंमती १,३०,००० /—रूपये असा एकुण ६,३०,००० /— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. सुटका केलेल्या जनावरांना गौविज्ञान अनुसंधान केंद्र, देवलापार येथे देखभाली करीता दाखल करण्यात आले.**

नमुद प्रकरणी आरोपीतांविरूध्द कलम २८१, ३(५) भान्यासं, कलम ११(१) (ड) प्रा. छ. अधि. सहकलम ५ (ए) ,९ महा.पशु संरक्षण अधिनियम, कलम ११९ मपोका, कलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **मोहम्मद माजीद मोहम्मद साबीर शेख, वय ३४ वर्ष, रा. लष्करी बाग, डॉ. आंबेडकर मार्ग, नागपूर याला अटक करण्यात आली आहे.**



## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०५ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक २२/०२/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, काली माता मंदिर शिरपूर भुयारी जवळ मोकळया जागेत. काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे कळमेश्वर पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) बंठी रमेश चुटे, वय ३५ वर्षे, २) विलास नानाजी तळेकर, वय ४१ वर्षे, ३) सजंय वामनराव मेहर, वय ३० वर्षे, ४) संकेत कन्होजीया जागंडे, वय ३० वर्षे, ५) लक्ष्मींकात उर्फ बाळू प्रभाकर मोटघरे,** यांना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून **५२ तास पत्ते आणि** रोख रक्कम ९५२/—रूपये असा एकुण ९५२/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०५ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी :—** दिनांक २२/०२/२०२६ रोजी एमआयडीसी बोरी पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता मौजा वॉलमार्क मेडीटेक कंपनी एमआयडीसी बोरी परिसरात **आरोपी नामे क्र. १) पंकज जिवन सुखदेवे, वय ३४ वर्ष, २) रितेश उर्फ शिवा सुर्यभान बावने, वय ३३ वर्ष, ३) नंदकिशोर सुखलाल उईके,**

**वय ३३ वर्ष, ४) रामकिशोर सुखलाल उईके, वय ३५ वर्ष, सर्व रा. गागांपुर झोपडपटटी** ता. हिंगना हे अंधारात आपले अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी संशयीतरित्या फिरतांना मिळुन आले. पोलीसांनी त्याची विचारपुस केली असता त्याने उडवा उडवीची उत्तरे दिली. नमुद आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीतांचे विरूध्द कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या, तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ८ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक २२/०२/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **मोहाफुल दारू, देशी दारू असा एकुण ४००५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन कुही** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे रोशन फुलसिंग राजपुत, वय ३८ वर्षे, रा. वार्ड क्र. १७ पहलेपार सावनेर यांचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी नामे शिवचंद सोमाजी खांडके, वय ५९ वर्षे, रा. विरशी याचेवर १ गुन्हा, पोलीस स्टेशन रामटेक येथे आरोपी नामे महादेव चतुरा नारनवरे, वय ८० वर्ष, **रा. इंदीरा टोली, नगरधन ता. रामटेक** यांचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी क्र. १) हेमराज रामचंद्र राजगुरू, वय ४२ वर्ष, रा. खैरगाव ता. नरखेड २) मनोहर भिमराव गजभिये, वय ४२ वर्ष, रा. खरसोली, ता. नरखेड ३) प्रकाश छोटुसिंग मेंडोले, वय ३६ वर्षे, रा. नरखेड ४) संतोष

नंदलाल समुद्रे, वय ५५ वर्षे, रा. वार्ड क्र १२, नरखेड यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे ४ गुन्हे नोंद, अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०८ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) २२ लिटर मोहाफुल गावठी दारू २) ४३२० मिली देशी दारू असा एकुण ४००५/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने